महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर https://jeevandeepvarta.com मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे Rs.2/-

मंगळवार ■ 28 जानेवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 213 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# पालकमंत्रीपदाचा वाद कायम

## रायगडमध्ये महायुतीत नाराजी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

२०२४मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड मोठे बहुमत मिळाले. भाजपा १३२ जागांसह सर्वांत मोठा पक्ष बनला, तर शिवेसना शिंदे गटाला ५७ जागा मिळाल्या, तसेच अजित पवारांच्याराष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागा मिळाल्या. यानंतर उपमुख्यमंत्रीपदासह मंत्रिमंडळ विस्तार, खातेवाटप आणि पालकमंत्रीपदावरून महायुतीत चांगलेच मानापमान नाट्य घडल्याचे पाहायला मिळाले. पालकमंत्रीपदावरून अद्यापही नाराजी नाट्याचा पुढील अंक सुरू असल्याचे दिसत आहे. नाशिक आणि रायगड पालकमंत्रीपदावरून शिंदेसेना आणि अजित पवारांच्याराष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जोरदार चुरस असल्याचे पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी राज्यातील सर्व पालकमंत्रीपदे जाहीर करण्यात आली. परंतु, नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाचा निर्णय स्थगित करण्यात आला. रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटातील वाद चांगलाच वाढताना दिसत आहे. भरत गोगावले यांचा समर्थक गट शक्तिप्रदर्शन करत असून, दबावतंत्र वापरत असल्याचे पाहायला मिळत आहे. तर सुनील तटकरेंवर शेलक्या शब्दांत टीका केली जात आहे. एकीकडे रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाचा वाद चिघळत चालला असताना, दुसरीकडे नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून रस्सीखेंच सुरू असल्याचे दिसत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नाशिक आणि रायगड या जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाबाबत काय निर्णय घेतात, जाहीर झालेली नावे कायम राहतात की, दबावतंत्रापुढे निर्णय बदलण्याची वेळ येते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे

### तिढा आजही कायम

नाशिक व रायगड जिल्ह्यातील पालकमंत्री पदाचा तिढा आजही कायम असून महायुतीतील घटक पक्ष शिवसेनेला व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये तू तू मैं मैं सुरुच आहे. नाशिक व रायगड जिल्ह्यातील पालकमंत्री पदाला स्थगिती दिली असली तरी अजित पवार पक्षाच्या नेत्या मंत्री आदिती तटकरे यांना रायगडचे पालकमंत्री पद दिल्याने एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेतील नाराजी आजही कायम आहे. रायगडचे आमदार भरत गोगावले यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर टीका केली होती. तेव्हा गोगावले यांना आवर घाला, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून शिंदेंच्या शिवसेनेला देण्यात आला आहे.

” भरत गोगवालेंनी आपली उंची पाहून बोलले पाहिजे. आम्हाला काढायचे म्हणले, तर गुवाहाटीलमधील हॉटेलच्या बाहेरचे आणि हॉटेलमधील व्हिडिओ आम्ही काढू शकतो. एकनाथ शिंदे यांनी गोगावलेंना आवर घालावा. सर्व सुरळीत सुरू असताना दोस्तीत कुस्ती करू नये. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणात लक्ष घालून योग्य तो न्याय करावा. महायुतीच्या निर्णयांचे स्वागत करण्याचे काम राष्ट्रवादीने केले आहे. रायगडचा पालकमंत्री आमचाच असेल. सह पालकमंत्री भरत गोगावले असतील,” **- सूरज चव्हाण, राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्ष**

### तटकरे यांनी पाठित खंजीर खुपसला - गोगावले

**आम्ही व्यवहाराने चालणारे आहोत. आमचं काम प्रामाणिक आहे. आम्ही चुकीचे काही करत नाही. सुनील तटकरेंनी विधानसभा निवडणुकीत प्रामाणिकपणे आमचे काम केले असते, तर आम्ही पालक मत्रिपदाबाबत विचार केला असता. पण, तटकरेंनी आमचे काम केलं नाही. तटकरेंनी आमच्या पाठीत पुन्हा खंजीर खुपसला. जे स्वतःच्या भावाचे होऊ शकले नाहीत. ते तुमचे-आमचे काय होणार?" असा प्रश्न गोगावलेंनी उपस्थित केला आहे.**

# म्हाडाच्या घरांची मागणी घटली

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : म्हाडाच्या कोकण मंडळाच्या २२६४ घरांसाठी ५ फेब्रुवारीला ठाण्यातील काशीनाथ घाणेकर नाट्यगृहात सोडत काढली जाणार आहे. त्यातील २२६४ घरांसाठी २४ हजार ९११ अर्ज दाखल झाले असले तरी २२६४ घरांपैकी तब्बल ७१३ घरांना एकही अर्ज दाखल झालेला नाही. म्हाडा गृहनिर्माण आणि १५ टक्के एकात्मिक योजनेतील घरांकडे इच्छुकांनी पाठ फिरविली आहे. मात्र त्याचवेळी खासगी विकासकांच्या घरांना अर्थात २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील घरांना मात्र अर्जदारांनी प्रचंड प्रतिसाद दिला आहे. २० टक्के योजनेतील ५९४ घरांसाठी तब्बल २३ हजार ५७४ अर्ज आले आहेत. एकूण प्राप्त अर्जांच्या ९० टक्क्यांहून अधिक अर्ज २० टक्क्यांतील घरांसाठी दाखल झाले आहेत. कोकण मंडळाकडून २२६४ घरांसाठी ११ ऑक्टोबरपासून अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मूळ वेळापत्रकानुसार ही प्रक्रिया १० डिसेंबरपर्यंत होती तर २७ डिसेंबरला सोडत काढण्यात येणार होती. मात्र या विहित मुदतीत घरांना प्रतिसाद न मिळाल्याने सोडतीला दोनदा मुदतवाढ देण्यात आली. परिणामी सोडतीची तारीख दोनदा पुढे ढकलण्यात आली आणि आता मात्र अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया संपुष्टात आली असून आता ५ फेब्रुवारीला २२६४ घरांसाठी सोडत काढली जाणार आहे. प्रत्यक्षात या दिवशी २२६४ घरांपैकी १५५१ घरांसाठी सोडत निघणार आहे. कारण २२६४ घरांपैकी ७१३ घरांना शून्य प्रतिसाद मिळाला आहे. शून्य प्रतिसाद मिळालेल्या या घरांमध्ये १५ टक्के एकात्मिक योजनेसह म्हाडा गृहनिर्माण योजनेतील घरांचा समावेश आहे. १५ टक्के योजनोतील ८२५ घरांसाठी केवळ ४१७अर्ज दाखल झाले असून ४०८ घरांना प्रतिसाद मिळालेला नाही. तर म्हाडा गृहनिर्माण योजनेतील ७२८ घरांसाठी केवळ ४३४ अर्ज दाखल झाले असून ३०५ घरांना प्रतिसाद मिळाला आहे. दरम्यान २२६४ घरांच्या सोडतीतील ११७ भूखंडांसाठी १४७ अर्ज सादर झाले आहेत.

सोडतीतील १५ टक्के आणि म्हाडा गृहनिर्माण योजनेतील ७१३ घरांना प्रतिसाद मिळाला नसला तरी दुसरीकडे २० टक्के योजनेतील घरांना मात्र प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. २० टक्के योजनेतील ५९४ घरांसाठी तब्बल २३ हजार ५७४ अर्ज दाखल झाले आहेत. एकूण प्राप्त अर्जांच्या ९० टक्क्यांहून अधिक अर्ज २० टक्के योजनेतील घरांसाठी आले आहेत. त्यामुळे म्हाडाच्या घरांपेक्षा खासगी विकासकांच्या २० टक्के योजनेतील घरांकडे अर्जदारांचा कल असल्याचे स्पष्ट झाले आहे. म्हाडाच्या सोडतीतील घरांना प्रतिसाद मिळावा यासाठी मंडळाने विशेष मोहिम राबवली, जाहिरात केली, मात्र त्यानंतरही म्हाडाच्या घरांना प्रतिसाद मिळालेला नाही. त्या अनुषंगाने कोकण मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सोडतीच्या प्रतिसादासंबंधी विचारणा केली असता त्यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

# पुण्यात जीबीएस रुग्णांची शंभरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

पुणे जिल्ह्यात गुलेन-बॅरे सिंड्रोमची रुग्णसंख्या शंभरीपार गेली आहे. आतापर्यंत पुण्यात याचे 101 रुग्ण आढळून आले आहेत. यातील 16 रुग्ण व्हेंटिलेटरवर आहे. या आजाराचा उपचार खूप महाग असल्याची माहिती समोर आली होती. रविवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितल्यानुसार, पुणे पालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात जीबीएसच्या रुग्णांवर मोफत उपचार केले जातील.

### जीबीएस कोणत्या वयोगटात अधिक?

जीबीएससारख्या दुर्मीळ मात्र उपचार करण्यायोग्य आजारामुळे 16 रुग्ण सद्यपरिस्थितीत व्हेंटिलेटरवर आहेत. याशिवाय लक्षणं असलेल्या तब्बल 19 रुग्णांचं वयोगट 9 वर्षांपेक्षा कमी आहे. तर 50-80 वयोगटातील 23 रुग्ण आहेत. रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांकडून घेतलेल्या काही जैविक नमुन्यांमध्ये कॅम्पिलोबॅक्टर जेजुनी बॅक्टेरिया आढळून आले आहेत. सी जेजुनीमुळे गंभीर संक्रमण होण्याची भीती आहे. त्यामुळे पुण्याच्या अधिकाऱ्याकडून पाण्याचे नमुने घेतले जात असून त्याची तपासणी केली जात आहे.

### जीबीएसची लक्षणे

- मेंदूकडून शरीरातील इतर अवयवांना मिळणारे संकेत कमी होतात.
- थकवा जाणवतो.
- हातापायाला मुंग्या येतात
- पायांपासून याची सुरुवात आणि चेहऱ्यापर्यंत पसरते.
- काहींना पाठदुखीचा त्रास.
- स्नायू कमकुवत होतात, हाता-पायांतील त्राण जातो.
- श्वास घ्यायला आणि गिळायला त्रास

विहिरीच्या तपासात बॅक्टेरिया ई.कोलीचं प्रमाण अधिक आहे. परीक्षणानुसार पुण्याचं मुख्य जलाशय खडकवासला धरणाजवळील एका विहिरीत बॅक्टेरिया ई.कोलीचं प्रमाण अधिक आढळलं आहे. मात्र या विहिरीतील पाण्याचा वापर करण्यात आला की नाही हे स्पष्ट झालेलं नाही. मात्र नागरिकांनी पाणी गरम करून पिण्याचा आणि जेवणापूर्वी अन्न गरम करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

### गुलेन-बॅरेचा शरीरावर नेमका कसा परिणाम होतो?

जीबीएसमध्ये प्राथमिक पातळीवर ताप, खोकला आणि श्वसन घेण्यास त्रास जाणवतो. इतर वेळी बाहेरील विषाणू किंवा बॅक्टेरियावर हल्ला करणारी आपल्या शरीरातील रोगप्रतिकारशक्तीच मज्जासंस्थेवर हल्ला करते. त्यामुळे मेंदूकडून शरीरातील इतर अवयवांना मिळणारे संकेत कमी होतात.



# जीवनदीप महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींना जिल्हा क्रीडा पुरस्कार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण कल्याण तालुक्यातील जीवनदीप कॉलेज गोवेली च्या विध्यार्थिनी काजल भाकरे व कामिनी बोस्टे यांना 26 जानेवारी रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते जिल्हा क्रीडा पुरस्काराने गौरविण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांनी या दोन्ही विध्यार्थिनीचे अभिनंदन केले आहे. जीवनदीप महाविद्यालयात प्राध्यापक सुरेश गणपत चडे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करणाऱ्या खेळाडू कुमारी काजल कृष्णा भाकरे व कुमारी कामिनी गणेश बोस्टे यांना 2022 -२३ या वर्षाचा जिल्हा क्रीडा पुरस्कार दिनांक 26 जानेवारी 2025 रोजी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री माननीय श्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या हस्ते ठाणे या ठिकाणी प्रदान करण्यात आला ग्रामीण भागातील शेतकरी कुटूंबातील या मुली आहेत.

**कल्याण कल्याण तालुक्यातील जीवनदीप कॉलेज गोवेली च्या विध्यार्थिनी काजल भाकरे व कामिनी बोस्टे यांना 26 जानेवारी रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते जिल्हा क्रीडा पुरस्काराने गौरविण्यात आले.**

# ठाण्याचे माजी महापौर अशोक राऊळ यांचे निधन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



ठाणे : ठाण्याचे माजी महापौर आणि ज्येष्ठ माजी नगरसेवक अशोक राऊळ यांचे रविवारी रात्री एका खासगी रुग्णालयात दिर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७५ होते. त्यांच्या पश्चात पत्नी असा परिवार आहे. ठाणे महापालिकेतील एक अभ्यासू नगरसेवक म्हणून त्यांची ओळख होती.


ठाणे येथील खोपट परिसरातून अशोक राऊळ हे निवडून येत होते. ते १९८६ मध्ये ठाणे महापालिकेत पहिल्यांदा नगरसेवक म्हणून निवड आले. पुढे १९९१-९२ या काळात ते ठाण्याचे महापौर झाले. १९८६ ते २०२२ या काळात ते सहा वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले. शांत, संयमी आणि अभ्यासू लोकप्रतिनिधी अशी त्यांची ओळख होती. सुरूवातीला ते काँग्रेस पक्षात होते. १९९९ मध्ये राष्ट्रवादी पक्षाची स्थापना झाल्यावर त्यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन शरद पवार यांची साथ दिली. यानंतर ते राष्ट्रवादी पक्षातून नगरसेवक म्हणून निवडुन आले. २०१७ मध्ये त्यांनी राष्ट्रवादी पक्षाला रामराम करत भाजपमध्ये प्रवेश केला आणि त्यानंतर भाजपच्या तिकीटावर निवडणूक लढवून ते नगरसेवक झाले.

प्रजासत्ताकदिनी तरूणांनी वेधले लक्ष ; प्रजासत्ताक दिनाचे बॅनर का नाहीत, भावी नगरसेवकांना सवाल, गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तिथे उपचार सुरू असताना त्यांचे रविवारी निधन झाले. वनमंत्री गणेश नाईक आणि भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सोमवारी सकाळी परेरानगर येथील घरी जाऊन राऊळ यांच्या पार्थिवाचे दर्शन घेत आदरांजली वाहिली. ठाण्यातील जवाहरबाग स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी भाजपा आमदार निरंजन डावखरे, राष्ट्रवादी ( शरद पवार गट) चे आमदार जितेंद्र आव्हाड, भाजप शहराध्यक्ष संजय वाघुले तसेच विविध पक्षातील नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# ‘नीट’ प्रश्नपत्रिकेचे स्वरूप बदलले

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : वैद्यकीय पदवी प्रवेश परीक्षेची (नीट) प्रश्नपत्रिकेचे स्वरुप बदलण्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा एजन्सीकडून (एनटीए) घेण्यात आला आहे. त्यानुसार आता परीक्षेतील पर्यायी प्रश्न वगळण्यात आले असून प्रश्नपत्रिका १८० प्रश्नांची असणार आहे. ही प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना तीन तासांचा कालावधी मिळणार आहे.



**प्रश्नपत्रिकेचा संभाव्य नमुना**

**प्रश्नपत्रिकेत 180 अनिवार्य प्रश्न असतील. पर्यायी प्रश्नांची तरतूद वगळली**

**परीक्षेचा एकूण कालावधी १८० मिनिटे (३ तास)**

करोना कालावधीमध्ये विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत परीक्षेचे स्वरूप बदलण्यात आले होते. मात्र आता परीक्षा जुन्याच पद्धतीनुसार घेण्याचा निर्णय एनटीएने घेतला आहे. करोना कालावधीमध्ये विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने नीट यूजीच्या परीक्षेत बदल करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार नीट यूजीच्या परीक्षेमध्ये ‘अ’ व ‘ब’ असे दोन विभाग करण्यात आले होते. ‘अ’ विभागात ३५ अनिवार्य प्रश्न होते, तर ‘ब’ विभागामध्ये १५ पर्यायी प्रश्न होते. मात्र करोनाचा प्रादुर्भाव संपुष्टात आल्याने एनटीएने परीक्षा मूळ पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे.

विक्रोळी रेल्वे स्थानकात युगुलाची मेल एक्स्प्रेस गाडीखाली आत्महत्या

या पद्धतीत प्रश्नपत्रिकेतून ‘ब’ विभाग काढून टाकण्यात येणार असल्याने पर्यायी प्रश्न नव्या प्रश्नपत्रिकेतून वगळण्यात येणार आहेत. त्यामुळे यापुढे नीट १८० अनिवार्य प्रश्नांची असेल. त्यात भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्रातील प्रत्येकी ४५ प्रश्न आणि जीवशास्त्रातील ९० प्रश्न असतील. हे प्रश्न सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना १८० मिनिटांचा म्हणजे तीन तासांचा कालावधी दिला जाणार आहे. तसेच करोनामध्ये परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना देण्यात आलेला अतिरिक्त कालावधीही कमी करण्यात आला आहे. नीट यूजीच्या नव्या पद्धतीनुसार विद्यार्थ्यांना तयारी करण्याचा सल्ला एनटीएकडून देण्यात आला आहे.

### पालकमंत्री उदय सामंत यांच्या संकल्पनेतून

# रत्नागिरीत ‘हॉस्पिटल ऑन व्हील’

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

रत्नागिरी : घराघरात आरोग्याची सुविधा पोहचविण्यासाठी ‘हॉस्पिटल ऑन व्हील’ ही संकल्पना रत्नागिरीत सुरू होणार आहे, असे आश्वासन पालकमंत्री उदय सामंत यांनी दिले.

येथील प्रादेशिक मनोरुग्णालय परिसरात प्रधानमंत्री आयुष्मान भारत हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर मिशन (पीएम अभीम) क्रिटिकल केअर युनिटच्या इमारतीचे भूमिपूजन सामंत यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, आरोग्याच्या सुविधा निर्माण करताना चांगल्या इमारती हव्यात.

ग्रामीण भागातील जनतेला आरोग्याची सुविधा उपलब्ध होण्यासाठी सीसीयूमुळे मदत होणार आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक कॅशलेस हॉस्पिटल रत्नागिरीमध्ये सुरू आहे. लवकरच हॉस्पिटल ऑन व्हील ही संकल्पना जिल्ह्यात आणणार असून, त्या माध्यमातून घराघरात आरोग्याच्या सुविधा पोहचविल्या जातील. डॉक्टरांनी रुग्णांवर हसत हसत उपचार केले पाहिजेत.

काही महिन्यांपूर्वी येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात एका रशियन महिलेच्या मानसिकतेवर उपचार करण्यात आले. घरच्यांपेक्षाही चांगले उपचार तेथे आल्यावर रुग्णांवर होतात. या महिलेवरही तसे उपचार झाल्यानंतर तिला तिच्या कुटुंबाकडे पाठविण्यात आले. एका अर्थाने हे प्रादेशिक मनोरुग्णालय आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्याचे काम झाले आहे. त्याबद्दल डॉ. फुले यांना धन्यवाद देतो, असे सांगून पालकमंत्री सामंत यांनी हे प्रादेशिक मनोरुग्णालय जिल्ह्यातच राहणार आहे. ते कोणत्याही जिल्ह्यात हलणार नाही, अशी ग्वाही दिली. शासकीय कार्यालयांबरोबरच शासकीय रुग्णालये, त्याचा परिसर, विशेषतः शौचालये, स्वच्छतागृहे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. ती जबाबदारी प्रत्येकांनी पार पाडावी, असेही ते म्हणाले.

## गीतासार



देहिनोऽस्मिन्यथा देहे
कौमारं यौवनं जरा ।
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र
न मुह्यति ॥२- १३॥

ज्याप्रमाणे जीवात्म्याला या शरीरात बालपण, तारुण्य, आणि वार्धक्य येते, त्याचप्रमाणे दुसरे शरीर मिळते. याविषयी धीर पुरुषांना मोह उत्पन्न होत नाही.
॥ २-१३ ॥

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय
शीतोष्ण सुखदुःखदाः ।
आगमापायिनोऽ नित्यास्तांस्ति
तिक्षस्व भारत ॥२- १४॥

हे कुंतीपुत्रा, इंद्रियांचे विषयांशी संयोग हे थंडी-उष्णता आणि सुख-दुःख देणारे आहेत. ते उत्पन्न होतात व नाहीसे होतात, म्हणून अनित्य आहेत. तेव्हा हे भारता, ते तू सहन कर. ॥ २-१४ ॥

यं हि न व्यथयन्त्येते
पुरुषं पुरुषर्षभ ।
समदुःखसुखं धीरं
सोऽमृतत्वाय कल्पते
॥२- १५॥

कारण हे श्रेष्ठ पुरुषा, सुख-दुःख समान मानणाऱ्या ज्या धीर पुरुषाला हे इंद्रियांचे विषयांशी संयोग व्याकुळ करीत नाहीत, तो मोक्षाला योग्य ठरतो.
॥ २-१५ ॥

### आरोग्य टिप्स

## कच्च्या वेलचीचे पाणी प्या



कन्सल्टंट डाएटिशियन कनिका मल्होत्रा आणि सर्टिफाइड डायबिटीज एज्युकेटर यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगितले की, "हिवाळ्यात कच्च्या वेलचीचे पाणी सेवन केल्याने अनेक आरोग्य फायदे मिळतात. वेलचीच्या पाण्याचे सेवन केल्याने शरीरातील विषारी घटक बाहेर पडतात आणि पचनक्रिया सुधारते. यामुळे गॅस आणि ब्लोटिंगची समस्या नियंत्रणात राहते.

**सर्दी, खोकल्यापासून मिळेल आराम**

यासह सर्दी, खोकला यांसारख्या श्वसनविषयक समस्यांपासून आराम मिळतो, ज्यामुळे थंड दिवसांत विशेषतः वेलचीच्या पाण्याचे सेवन करणे फायदेशीर ठरते. वेलचीच्या सेवनाने रक्ताभिसरण क्रियेला चालना मिळते. शरीर उबदार ठेवण्यास मदत होते, यामुळे थंडीच्या दिवसांत आरामदायी वाटते.

**रक्तदाबाची समस्या होईल कमी**

यामुळे काहींना रक्तदाबाचा त्रास जाणवू शकतो. रक्तदाब अचानक कमी होणाऱ्या लोकांनी वेलचीचे पाणी पिणे टाळले पाहिजे. यासह अँटीकोआगुलंट्स आणि अँटीडायबेटिक औषधांचे सेवन करणाऱ्या लोकांनीही नियमित वेलचीच्या पाण्याचे सेवन करण्यापूर्वी डॉक्टरांचा योग्य सल्ला घ्या.

### तेथे कर माझे जुळती

# लाला लजपतराय जयंती

## (लाल,पाल,बाल यांचा भारतीय राजकारण व समाजकारण यावरील प्रभाव)



विसाव्या शतकाच्या सुरुवातीला राष्ट्रीय चळवळीत जे तीन पुढारी देशभर विख्यात झाले त्या लाल बाल व पाल या तीन पैकी पंजाब चे लाला लजपतराय महाराष्ट्राचे बाळ गंगाधर टिळक आणि बंगालचे बिपिन चंद्र पाल या तीन महामानवांचा समावेश होता .समाज बांधवांबद्दल तिघांना करुणा होती प्रखर राष्ट्रवादाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी वृत्तपत्रातून तिघांनी जागृतीसाठी प्रयत्न केले .विशेषतः 1905 साली लॉर्ड कर्झन ने बंगालची फाळणी केली . तेव्हा बिपिन चंद्र पाल लोकमान्य टिळक आणि लाला लजपत राय यांनी एकत्र येऊन बंगालची फाळणी रद्द करून टाकली . प्रत्येकाची कार्य आपण विस्तृतपणे पाहूया .

**लाला लजपतराय राय :**

पंजाबचा सिंह म्हणून ओळखले जाणारे इतिहास संस्मरणीय असलेले लाला लजपतराय लढवय्ये व फर्डे वक्ते होते .सन 1888 मध्ये ते काँग्रेसमध्ये प्रविष्ट झाले होते . त्यांनी ' पंजाब ' नावाचे वृत्तपत्र काढले . ते निष्ठावंत पत्रकार होते .पंजाबी वृत्तपत्राने पंजाबात राष्ट्रीय चळवळीचे रान पेटविले आणि त्यातील ज्वलंत लिखाणाचा सरकारवर परिणाम झाला. ब्रिटिश सरकारने नऊ मे 1907 रोजी त्यांना ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात हद्दपार केले .पुढे सहा महिन्यांनी त्यांची सुटका झाली .ते पुढे इंग्लंड व अमेरिकेत गेले . परदेशात देखील त्यांनी वृत्तपत्राद्वारे हिंदी स्वातंत्र्याचा प्रचार केला . तथापि 1919 च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर हिंदुस्थानात परत आले . त्यानंतर कलकत्ता काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. शैक्षणिक , धार्मिक व समाजसेवेच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान तत्कालीन समाजाला लाभले .आर्य समाजाचे डी .ए .व्ही .कॉलेज व फिरोजपुर चे हिंदू अनाथालय तसेच टिळक राजनीती संस्था इत्यादी अनेक विविध संस्था स्थापन करून त्यांनी लोकसेवेचे व भूतदयेचे कार्य केले . त्यांनी ' पीपल्स सोसायटी 'नावाची समाजसेवकांची संस्था काढली होती . त्यांनी अनेक पुस्तके लिहिली ' दुखी भारत ' ( अनहॅपी इंडिया ) , ' दि व्हाईस ऑफ ट्रूथ ' व 'दि एसेम ऑफ दि ईस्ट ' ही त्यांचे पुस्तके जगभर गाजली आणि आजरामरही झाली . दिनांक 30 ऑक्टोबर 1928 रोजी लाहोरला सायमन कमिशन आले .त्यावेळी या कमिशनच्या निषेधार्थ निघालेल्या मिरवणुकीचे नेतृत्व (लीडरशिप )त्यांच्याकडे होते . पोलिसांनी या मिरवणुकीवर लाठी हल्ला केला .लालाजीं वर ब्रिटिश अधिकारी सँडर्सने दंडुक्यानी निर्दयतेने प्रहार केले . वर्मी घाव बसला . त्यांना वीरमरण आले आणि त्यांची प्राणज्योत वयाच्या 63 व्या वर्षी मालवली . लालाजींवर सुरेंद्रनाथांच्या जहाल मतवादाचा प्रभाव होता .18 व्या शतकात इटली मध्ये जे कार्य जोसेफ मॅझिनी यांनी केले त्याचाही प्रभाव लालाजींवर पडला होता . संपूर्ण हिंदुस्थानात ब्रिटिशांचे विरोधात जनमत संघटित करण्यावर त्यांनी भर दिला होता .अमेरिकेत असताना अमेरिकेतील भारतीयांना स्वातंत्र्याची जाणीव करून देण्यासाठी त्यांनी ' यंग इंडिया ' हे वृत्तपत्र काढले होते .त्यातून ते भारतीय स्वातंत्र्याचे विचार सातत्याने मांडत होते . त्यांनी 'श्रीकृष्ण ' 'छत्रपती शिवाजी महाराज ' यांची चरित्रेही लिहिली .

**बिपिनचंद्र पाल :**

बंगालचे अत्यंत जहाल आणि क्रांतिकारक पुढारी म्हणून बिपिन चंद्र पाल यांची ख्याती होती .ते वृत्तपत्रकार व उत्कृष्ट वक्ते होते . त्यांच्या लेखणीपेक्षा त्यांची वाणी अधिक प्रभावशाली होती . ते लहानपणापासूनच बंडखोर होते . कॉलेजात असतानाच ते ब्राह्मो समाजात शिरले . त्यांनी एका बाल विधवेशी पुनर्विवाह करून समाजात क्रांती निर्माण केली होती . त्याकाळी बाल विधवेशी पुनर्विवाह करणे निषिद्ध मानले जात असे . त्यांच्या वडिलांनी त्यांचा वारसा हक्क रद्द केला आणि तत्कालीन समाजाने देखील त्यांना वाळीत टाकले होते . सर्वप्रथम कटक अकॅडमीचे ते मुख्याध्यापक ( हेडमास्टर ) झाले . बंगलोरला काही काळ ते शिक्षक होते .सन 1907 मध्ये अरविंद घोष यांच्याविरुद्ध कोर्टात राजद्रोहाचा खटला चालू होता . त्यात कोर्टाने त्यांना साक्षी करिता म्हणून बोलावले असता त्यांनी स्वाभिमान पूर्वक नकार दिला . तेव्हा कोर्टाची बेअदबी केल्याच्या आरोपावरून त्यांना सहा महिन्याची शिक्षा देण्यात आली. बिपिन चंद्र पाल यांनी ब्रिटिशांच्या विरोधात जनजागृती साठी अनेक वर्तमानपत्रे काढली आणि चालवली देखील . अनेक वर्तमानपत्रांचे संपादनही केले . ट्रिब्यून , न्यू इंडिया , वंदे मातरम् , स्वराज्य , हिंदू रिव्ह्यू , डेमो कॅट इत्यादी अनेक वृत्तपत्रातून ते जहाल लेख लिहीत म्हणून त्यांना हद्दपार करण्याचा विचार ब्रिटिश सरकार करत होते . त्यांनी 1908 ते 1911 पर्यंत स्वतःच हद्दपारी पत्करली आणि ते इंग्लंडमध्ये जाऊन होमरूल लीग शिष्ट मंडळांबरोबर विलायतेत जाऊन कार्यरत राहिले . जहाल धोरण त्यांना मान्य होते . ब्रिटिशांशी जशास तसे आणि ठोशास ठोसे हे धोरण त्यांना मान्य होते . त्यामुळे महात्मा गांधींचा असहकारितेचा कार्यक्रम त्यांना पसंत नव्हता .जनमानसात स्वदेशाविषयी व स्वातंत्र्याविषयी परखड विचार करणारा हा वक्ता दिनांक 20 फेब्रुवारी 1932 रोजी स्वातंत्र्य न मिळाल्याने निष्प्रभ होऊन 74 यावर्षी कालवश झाला .

**राष्ट्रपुरुष लोकमान्य टिळक :**

"स्वराज्य माझा हा माझा जन्मसिद्ध आहे आणि तो मी मिळवणारच "अशी सिंहगर्जना करणारे बाळ गंगाधर टिळक यांनी मृतवत समाजाच्या मनात स्वातंत्र्य भावनेचे स्फुल्लिंग चेतवले . म्हणून टिळकांना 'भारतीय राष्ट्रवादाचे जनक ' म्हटले जाते .त्याकाळी त्यांनी चिपळूणकर आगरकर या सहकाऱ्यांच्या साह्याने शाळा व महाविद्यालये काढली . केसरी व मराठा ही वर्तमानपत्रे सुरू केली . परक्या इंग्रजी सत्येबद्दल लोकांमध्ये असंतोष निर्माण केला . " केसरी " या वृत्तपत्रातून . ' देशाचे दुर्दैव 'यासारखे आक्षेपार्ह लेख लिहिल्यामुळे भारतातील क्रांतिकारकांना स्फूर्ती मिळाली .देश प्रेमाची भावना जागृत केल्याबद्दल त्यांना तुरुंगात कारावास भोगावा लागला . अमोघ वाणी व ज्वलंत लेखणी आणि अचाट करणी यामुळे लोकमान्य टिळक हे अजरामर ठरले . त्यांच्या राष्ट्रीय व सामाजिक कार्यामुळे जनतेने त्यांना 'लोकमान्य ' ही पदवी दिली . टिळकांना 'हिंदुस्थानी असंतोषाचे जनक 'असे म्हटले जाते .त्यांनी स्वदेशी , स्वराष्ट्र , स्वराज्य या त्रिसूत्रीने ब्रिटिशांची झोप उडवली . केसरी मधील जहाल लेखनाबद्दल त्यांच्यावर राज द्रोहाचा खटला भरून त्यांना सहा वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा झाली . सन 1908 मध्ये मंडाले येथे तुरुंगात ठेवण्यात आले . तेथे त्यांनी 'गीता रहस्य ' नावाचा ग्रंथ लिहिला. 1914 साली त्यांची सुटका झाली .लोकजागृतीसाठी त्यांनी गणेशोत्सव शिवजयंती उत्सव सुरू केले .हिंदू मुस्लिम ऐक्यासाठी लखनऊ करार घडवून आणला . विद्वान पत्रकार , जहाल देशभक्त , तसेच लोकोत्तर पुरुष म्हणून त्यांचा गौरव होतो .त्यांनी गीते सारख्या तात्विक व अलौकिक ग्रंथावर भाष्य लिहिले .अशाप्रकारे लोकमान्य टिळकांनी जवळजवळ 40 वर्षे देशी सेवेसाठी खर्च केली. या चाळीस वर्षात त्यांनी राजकीय जीवनाचा पाया घातला .राजकारण ही करमणूक नाही . राजकारण जीवनाचा एक भाग आहे . अशी श्रद्धा लोकमान्य टिळकांनी निर्माण केली . वृत्तपत्र हे लोक शिक्षणाचे प्रखर माध्यम आहे . म्हणून त्यांनी वृत्तपत्र प्रचार हाती घेतला . शिक्षण संस्था काढल्या . केसरी या वृत्तपत्रातून लोकांची सामाजिक गाऱ्हाणी वेशीवर टांगली .त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली . अशाप्रकारे विसाव्या शतकाच्या सुरुवातीस टिळकयुग सुरु झाले. स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण , बहिष्कार व स्वराज्य ही त्यांची चतुःसूत्री होती . अफाट उत्साह , मौलिक राजकीय शिक्षण , राष्ट्रीय ध्येय , श्रद्धेला कार्याची जोड व त्याला अनुसरून अशी तत्वे असा ठेवा त्यांनी भारताला दिला. त्यांचे जीवन कृतार्थ झाले .

धन्य ते लाल , पाल व बाल !



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

## वडिलांच्या पुण्यस्मरणानिमित्त किर्तनकारांचा सन्मान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : स्व.अनंत गणपत कथोरे यांच्या स्मरणार्थ मुरबाड तालुक्यातील किर्तनकार व प्रवचनकारांचा भव्य सत्कार समारंभ मुरबाड नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष किसन कथोरे यांनी आयोजन केले होते. सौ.कमलनानी किसन कथोरे जी.प.सदस्य उल्हास बागंर,जयवंत सुर्यराव सर,रामभाऊ दळवी यांच्या हस्ते तब्बल 45 किर्तनकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रसिद्ध शिवव्याख्यात्या,उत्कृष्ट सुत्रसंचालक सौ.करूणाताई गगे यांचा ही विशेष सन्मान कारण्यात आला. या सत्कार समारंभास टी.डी.सी.बँक संचालक राजेश पाटील, माजी नगराध्यक्ष मुकेश विशे, मोहन सासे, रामभाऊ दुधाळे, सुहास मोरे,गुलाबराव घाडगे,अनिल वायले,गणेश कथोरे, गणेश लाटे,नगरसेवक जगन माळी तसेच मुरबाड तालुक्यातील वारकरी संप्रदायातील किर्तनकार, प्रवचनकार यांच्या उपस्थितीत हा सत्कार समारंभ पार पडला. आपल्या वडिलांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्त महाराजांना विठ्ठल- रुक्मिणीची मुर्ती,शाल, श्रीफळ देऊन अगळावेगळा सन्मान करून किसन अनंत कथोरे यांनी वेगळा आदर्श निर्माण केला आहे. स्व.अनंत गणपत कथोरे यांचे समाजासाठी असलेले योगदान समाजाप्रति प्रेम तसेच समाज सेवेची आवड होती .अनेक धार्मिक कार्यक्रमात त्यांचा सहभाग असायचा. ते समर्थ नानासाहेब धर्माधिकारी यांचे दासही होते. सर्वांनाच हवेसे वाटणारे सर्वांसी प्रेमाने राहून कधी ना कोणावर राग ना रुसवा स्व.अनंत गणपत कथोरे यांना आजाराने ग्रासले आणि मागिल वर्षी बुधवार दि.07 फेब्रुवारी 2024 रोजी मृत्यू झाला त्यांच्या जाण्याने त्यांचा कथोरे परिवार, नातलग,सामाजिक,राजकीय तसेच मुरबाड पंचक्रोशीत दुःखाचा डोंगर कोसळला होता. तिथीप्रमाणे रविवार दि.26 जानेवारी 2024 रोजी प्रथम पुण्यस्मरणा निमित्त मुरबाड छत्रपती संभाजीनगर येथे हरिपाठ,भजन,ह.भ.प.अमोल महाराजपिसे(राहुरी,जि.अहिल्यानगर) यांचे किर्तन सेवा होती तर त्यांना मृदुंगमनी नितीन चौधरी यांनी साथ दिली.

## महाराष्ट्र मिलिटरी स्कूल तळवली येथे प्रजासत्ताक दिन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील तळवली (बा) येथील महाराष्ट्र मिलिटरी स्कूल मध्ये देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत मनमोहक स्वरुपात करण्यात आला. उल्लेखनीय बाब म्हणजे मिलिटरी स्कूल मधील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या चित्तथरारक प्रात्यक्षिकं बघुन उपस्थितांच्या डोळयांचे पारणे फिटले. प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध अभिनेत्री लेखक,दिग्दर्शीका, मृणाल कुलकर्णी उपस्थित होत्या. यावेळी महाराष्ट्र मिलिटरी स्कूल चे संचालक रणजित सावरकर, सौभाग्यवती सावरकर,त्याचबरोबर मिलिटरी स्कूलचे प्राचार्य काशीनाथ भोईर तसेच मिलिटरी स्कूलचे सर्व शिक्षक वर्ग आणि मिलिटरी स्कूल मध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलांचे पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य काशीनाथ भोईर यांनी केले तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी मिलिटरी स्कूल मधील परेड, व विद्यार्थ्यांची चित्तथरारक प्रात्यक्षिके बघून आपल्या मनोगतात पालकांचे व विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

संबंधित कार्यक्रमाचे औचित्य साधून मिलिटरी स्कूल मधील विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविण्याऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

## शिक्षक संघाच्या तालुका अध्यक्षपदी दिपक पालकर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : प्राथमिक शिक्षक संघाची महत्त्वपूर्ण सभा खालापूर येथे पार पडली. यावेळी रिक्त असलेल्या अध्यक्ष पदासाठी संघटनेत तळमळीने, सक्रियपणे कार्य करत तालुका शिक्षक संघाचा डोलारा उत्तम प्रकारे सांभाळणारे आणि आपल्या कर्तुत्वाने खालापूर गटातच नव्हे तर रायगड जिल्ह्यात शैक्षणिक कार्य रूपाने प्रसिद्ध असलेले , जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त, तसेच रायगड जिल्हा दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष दीपक पालकर यांची अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली.

यावेळी तालुक्यातील संघटनेचे नेते दिलीप देशमुख, अध्यक्ष संदीप जाधव, केंद्रप्रमुख तथा माजी अध्यक्ष संतोष पाटील,केंद्रप्रमुख तथा जिल्हा उपाध्यक्ष हेमंत म्हात्रे, माजी अध्यक्ष उमेश विचारे, कार्याध्यक्ष मारुती दासरे, खजिनदार विठ्ठल देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष सचिन कडू, संदीप सुर्वे, सहसरचिटणीस बळीराम चव्हाण,राजेश बावीस्कर तालुका पगार यंत्रणेचे शशिकांत फणसे किरण धारणे, महिला आघाडी श्रीमती मनीषा माळी अंजली विचारे अनिता चव्हाण जयश्री सुर्वे कांचन कडू,दीपाली कांबळे,वंदना कदम, सुवर्णा बळी तसेच संघप्रेमी शिक्षक बंधू भगिनी कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हा उपाध्यक्ष सचिन कडू यांनी सर्वांचे स्वागत करून सभेला सुरुवात केली. सभेचे प्रास्ताविक सरचिटणीस दीपक पालकर यांनी केले. संघाचे खजिनदार विठ्ठल देशमुख यांनी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाचा जमा खर्च थोडक्यात वाचून दाखवला. सर्वानुमते जमाखर्चास मंजुरी देण्यात आली. त्यानंतर उमेश विचारे यांनी शिक्षक वर्धापन दिन आढावा व संघाचा इतिहास याबाबत विस्तृत माहिती दिली. संघटनेचे विद्यमान अध्यक्ष संदीप जाधव यांनी 11 जानेवारी रोजी कौटुंबिक अडचणीमुळे आपला राजीनामा सुपूर्द केला त्यामुळे त्यांच्या अध्यक्षपदाच्या रिक्त जागेवर नेमणूक करणे आवश्यक होते. यासाठी संघटनेत तळमळीने, सक्रियपणे कार्य करत तालुका शिक्षक संघाचा डोलारा सरचिटणीस पदी सांभाळणारे आणि आपल्या कर्तुत्वाने खालापूर गटातच नव्हे तर रायगड जिल्ह्यात शैक्षणिक कार्य रूपाने प्रसिद्ध , जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त, तसेच रायगड जिल्हा दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष, दीपक पालकर यांची अध्यक्षपदी निवड तर धनाजी थिटे यांची सरचिटणीसपदी आणि पांडुरंग काळे यांची सह चिटणीसपदी निवड जाहीर झाली .शिक्षक संघात गेल्या अनेक वर्ष आघाडीवर कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी मिळाल्याबद्दल सर्वांनी आनंद व्यक्त केला. सर्वांनी कार्यास शुभेच्छा दिल्या. अत्यंत उत्साही वातावरणात आजची सभा पार संपन्न झाली सरचिटणीस धनाजी थिटे यांनी सर्वांचे आभार मानले.

### जेष्ठ साहित्यिक अरुण म्हात्रे यांच्या हस्ते

## जीवनदीप मध्ये ध्वजारोहण संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : 26 जानेवारी हा दिवस संपूर्ण देशात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. कारण याच दिवसापासून लोकशाही शासन व्यवस्था अस्तित्वात आली. जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे देखील आजचा हा दिवस अत्यंत उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळेस प्रमुख अतिथी म्हणून आपल्या अनोख्या काव्यशैलीने साहित्य क्षेत्रात नाव कमावणारे मराठी भाषेतील कवी, गीतकार ,निवेदक मा.अरुण म्हात्रे हे उपस्थित होते. ध्वजारोहण करून तिरंग्याला मानवंदना देत कार्यक्रमाला सुरुवात केली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत गाऊन कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी अरुण म्हात्रे यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यात ते म्हणाले बदलत्या डिजिटल तंत्रज्ञानामुळे आजची तरुण पिढी वाचनापासून दूर झालेली दिसते त्यांनी जास्तीत जास्त वाचन करायला हवं त्यातूनच त्यांना ज्ञान प्राप्त होऊ शकत. लेखनाचा कौशल्य सुधारू शकत. त्याचबरोबर त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या गायनातून कवितेची गोडी निर्माण केली. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना कर्तव्याची जाणीव करून दिली. आणि सद्यस्थितीच्या या आजूबाजूला घडणाऱ्या भयानक दृश्यांवर लक्ष देत आजच्या भरकटच्या तरुण पिढीमध्ये कर्तव्याची जाणीव निर्माण व्हावी या साठी एनएसएस च्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून कार्यक्रमाचा समारोप केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीश लकडे यांनी केले. यावेळेस महाविद्यालयाच्या संचालिका सौ स्मिता घोडविंदे, संचालक प्रशांत घोडविंदे, उपाध्यक्ष शांताराम भोईर, प्राचार्य.डॉ के.बी कोरे, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे , विधी कॉलेजचे प्रा.जयकुमार रिजवानी, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य. प्रकाश रोहणे, निर्मल इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका भावना कुंभार, समाजसेवक अशोक भोईर त्याचबरोबर सर्व प्राध्यापक प्राध्यापिका, विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम उत्साह मध्ये संपन्न झाला.

## प्रॉक्टर अँड गॅम्बल निवृत कर्मचाऱ्यांचा मेळावा




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : प्रॉक्टर अँड गॅम्बल निवृत्त कर्मचारी कौटुंबिक स्नेह मेळावा 2025 बुधवार दिनांक 22 जानेवारी 2025 रोजी सायंकाळी चार ते आठ वाजेपर्यंत ठाण्यातील सहयोग मंदिर सभागृह येथे आयोजित केला होता.

कार्यक्रमाचा सुरुवातीला प्रथम विकास कर्वे गोपाळराव गाडगीळ सतीश मानदुसकर, गणेश पूजन आणि दीप प्रज्वलन केले रघु करकरे यांनी प्रास्ताविक करून गतवर्षाचा टाळेबंद हिशोब सांगितला. प्रॉक्टर गॅम्बल कर्मचारी कुटुंबातील ज्यांना देवाज्ञा झाली त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

गेल्या 30-35 वर्षांपूर्वीच्या स्नेहाचा एकोप्याचा आनंदाचा मिळाव्यात निवृत्त कर्मचारी कुटुंबासहित आपल्या गोड कटू आठवणींना उजाळा देऊन वर्तमानाचा आणि भविष्याच्या आनंदमय गप्पा मारून विचारांची देवाण-घेवाण करीत होते. दरम्यान अशोक जगताप, शिवाजी सोनवणे, सिराज शेख अशा अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि पुढील वर्षापर्यंत पुढील एवढ्या सुखद आठवणी दिल्या कोणी त्या काळातील आनंदमय गीते गायली दरम्यान आयोजकांकडून नाश्ता आणि भेटवस्तूचे वाटप करण्यात आले. यावेळी आयोजक रमेश फाटक गोपाळराव गाडगीळ सतीश मांदूशस्कर रघु करकरे इत्यादींचे आभार मानण्यात आले . कार्यक्रमाची सांगता गोपाळराव गाडगीळ यांनी आलेल्या सर्व मित्रमंडळींचे आभार मानून धन्यवाद दिले आणि पुढील वर्षी सुद्धा या कार्यक्रमात यायचे हो हे सांगण्याचा विसरले नाही. पत्रकार शरद शहाणे यांनी कार्यक्रमाचे सर्व फोटो काढून आनंद द्विगुणित केला.

## केडीएमसीमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : ७६ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयात सकाळी ७.३० वाजता राष्ट्र ध्वज फडकावून आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी ध्वजाला मानवंदना दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, शहर अभियंता अनिता परदेशी, महापालिका उपायुक्त, इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

## जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे : 76 व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते आज ध्वजारोहण संपन्न झाले.

यावेळी नगरपालिका प्रशासन संचालनालयाचे संचालक मनोज रानडे, महाराष्ट्र रस्ते विकास प्राधिकरणाच्या सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.वैदेही रानडे, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उपजिल्हाधिकारी (सर्वसाधारण) हरिश्चंद्र पाटील, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्केपाटील, मल्लिकार्जून माने, उपजिल्हा निवडणूक अधिकारी



वैशाली माने, ठाणे प्रांताधिकारी उर्मिला पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख बाबासाहेब रेडेकर, जिल्हा राष्ट्रीय सूचना व विज्ञान अधिकारी नरेंद्र भामरे, जिल्हा हिवताप अधिकारी संतोषी शिंदे, तहसिलदार डॉ.आसावरी संसारे, संदीप थोरात, रेवण लेंभे, उज्वला भगत, उमेश पाटील, नायब तहसिलदार दिनेश पैठणकर, राहुल सूर्यवंशी, सहाय्यक अभियंता कल्याणी पाटील, जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. शिनगारे यांनी यावेळी उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## रुग्णवाहिके अभावी युवकाचा मृत्यू

### उल्हासनगरातील आरोग्य व्यवस्था चव्हाटयावर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर : अत्यवस्थ असणाऱ्या एका तरुणाला पुढील उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्याकरिता तब्बल ६ तास १०८ ॲम्बुलन्स उपलब्ध न झाल्याने त्याला जीव गमवावा लागला. यामुळे पुन्हा एकदा उल्हासनगर मधील आरोग्य सेवेचा उडालेला बोजवारा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आलाय.

उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात धक्कादायक प्रकार घटला असुन रुग्णाला कळवा रुग्णालयात नेण्यासाठी १०८रुग्णवाहिकेला ला फोन करुन सुध्दा सदर रुग्णवाहिका ६ तासा पर्यंत आलीच नाही, त्यामुळे एका ३६ वर्षीय राहुल इधाते या रुग्णाला आपला जीव गमवावा लागला आहे. तेव्हा या १०८ रुग्णवाहिका पुरवन्याचे चे काम शासनाने ज्या कंपनीला दिले आहे त्या कंपनीवर कारवाई



करन्याची मागणी समाजसेवक व राष्ट्रवादीचे प्रवक्ते शिवाजी रगडे यांनी शासना कडे केली आहे. अशा रुग्णवाहिका पुरवणाऱ्या अशा बेजबाबदार कंपनीवर कठोर कारवाई ची मागणी शिवाजी रगडे यांनी केली आहे.

उल्हासनगर कँप २ येथील हर्षवर्धन नगर येथे राहणारा राहुल इधाते हा तरुण मध्यवर्ती रुग्णालयात उपचारासाठी दाखल होता. त्याला अधिक त्रास होऊन अत्यवस्थ झाल्याने खाजगी रुग्णालयात नेण्यासाठी रुग्णावाहीकेची तातडीची गरज होती.

दरम्यान खाजगी रुग्णालयात नेण्यासाठी शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात कर्तव्यावरील डॉक्टरानी ही लिहुन देण्यास नकार दिला.बराच वेळेनंतर कळवा रुग्णालयात नेण्यासाठी डॉक्टरानी लिहुन दिले. मात्र , त्या रुग्णाला नेण्यासाठी डॉक्टर उपलब्ध असलेली १०८ रुग्णवाहीका सहा तास उलटून ही उपलब्ध झाली नाही.

परिणामी , रुग्ण राहुल इधाते याची तब्येत अधिक खालावत गेल्याने अखेर राहुलला जीव गमवावा लागला. राहुलच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या या बेजबाबदार ठरलेल्या शासनास रुग्णवाहीका पुरवणाऱ्या कंपनीवर कारवाई करावी अशी मागणी राष्ट्रवादीचे प्रवक्ते शिवाजी रगडे यांनी केली आहे.

उल्हासनगर शासकीय मध्यवर्ती रुग्णालयाचे शल्य जिल्हा चिकित्सक डॉ. मनोहर बनसोडे यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेत शासनाकडे या संदर्भात तक्रार करणार असल्याचे म्हटले आहे.

## मुरबाड शहरात प्रजासत्ताक दिन साजरा





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड : 76 वा प्रजासत्ताक दिन सर्वत्र आनंदात व जल्लोषात साजरा होत असताना मुरबाड शहर व तालुक्यातही सर्व शासकीय कार्यालये , शाळा, महाविद्यालये अशा सर्वच ठिकाणी उत्साहात साजरा झालेला पाहायला मिळाला. स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी मुरबाड शहरातील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये ध्वजारोहण केले तर तहसीलदार अभिजित देशमुख यांनी तहसिल कार्यालयाच्या प्रांगणात ध्वज फडकाविला. तसेच मुरबाड नगरपंचायतच्या कार्यालया समोर प्रभारी नगराध्यक्षा मानसी देसले यांनी ध्वजारोहण केले.यावेळी मुख्याधिकारी मनोज म्हसे यांच्या सह माजी नगराध्यक्ष, सर्व आजी माजी नगरसेवक, नगरपंचायतचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## जागर प्रजासत्ताक दिनाचा.. प्रयत्न परंपरा जपण्याचा...!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
पालघर : 26 जानेवारी 2025 रोजी संस्कृती कलादर्पण संस्था ,सातपाटी च्या वतीने आयोजित शालेय विद्यार्थ्यांचा कवायत संचलन कार्यक्रम जागर प्रजासत्ताक दिनाचा ..प्रजासत्ताक दिन संस्मरणीय करण्याचा हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला..

संस्कृती आणि परंपरा जपण्याचा ध्यास घेऊन सातपाटी गावात विविध सांस्कृतिक,शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रम संस्थेच्या माध्यमातून वर्षभर राबवले जातात..ज्या मध्ये हिंदू नववर्ष स्वागत शोभायात्रा अर्थात गुढीपाडवा ,दिवाळी पहाट,मच्छीमार दिन,हुतात्मा दिन वक्तृत्व स्पर्धा,नारळी पौर्णिमा उत्सव ,तिथीनुसार शिवजन्मोत्सव व्याख्यान यासारखे संस्कृती प्रधान आणि परंपरा जपणारे सण उत्सव आणि कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.या उपक्रमामुळे भावी पिढीत संस्कृती जतन आणि संवर्धनाचे धडे आणि आदर्श रुजविण्याचा प्रयत्न होताना दिसतोय. गावातील लोकही या उपक्रमाच्या आयोजनामुळे



संस्थेची भरभरून स्तुती करताना दिसतात . प्रजासत्ताक दिन कवायत संचलन कार्यक्रम आयोजन 1996-97 ला सातपाटी गावात सर्व शाळांच्या सहभागाने होत असे.पण नंतर काही कारणाने ते बंद पडले. शिस्त,नेतृत्व,लवचिकता , एकाग्रता,अचूकता अशा विद्यार्थी गुणांना वाव मिळावा म्हणून संस्थेच्या सदस्यांनी हा कार्यक्रम पुन्हा पुनरुज्जीवित करण्याचा निर्णय घेतला आणि 2023 मध्ये पुन्हा एकदा कवायत संचलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले

## एसटी भाडेवाढ मागे घ्या

### शरद पवार गटाची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई : राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या प्रवासासाठी आता प्रवाशांना अधिक भाडे मोजावे लागणार आहे. एसटीची भाडेवाढ थांबवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा एल्गार सुरू झाला आहे. एसटी भाडेवाढीचा निर्णय तत्काळ मागे घेण्याची मागणी पक्षाकडून केली आहे.

एसटीची सेवा ही ग्रामीण आणि शहरी जनतेसाठी जीवनरेखा आहे. भाडेवाढीमुळे गरीब आणि मध्यमवर्गीयांवर आर्थिक बोजा पडतो. सरकारने त्वरीत हा निर्णय मागे घेत जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते अमोल मातेले यांनी केली. परिवहन मंत्र्यांनी भाडेवाढीचा निर्णय घेतला नसेल, तर मग हा निर्णय कोण घेते? हे खाते कोण चालवते असा प्रश्न उपस्थित करून एका बाजूला परिवहन मंत्री जबाबदारी झटकतात, तर दुसऱ्या बाजूला उपमुख्यमंत्री अजित पवार या निर्णयाला विरोध करतात. मग एसटीची भाडेवाढ हा निर्णय नेमका कुणाचा आहे, सरकारच्या प्रत्येक निर्णयामागे गोंधळच दिसतो, असे मत त्यांनी व्यक्त केले. भाडेवाढीचा निर्णय अधिकाऱ्यांनी घेतला असेल, तर त्यांच्यावर कारवाई का होत नाही? जर चांगले निर्णय झाले तर मंत्र्यांना श्रेय मिळते पण चुकीचे निर्णय झाले की अधिकाऱ्यांना जबाबदार धरणे,
ही सरकारची दुटप्पी भूमिका आहे, असे मातेले म्हणाले.

मंत्री आणि अधिकाऱ्यांमध्ये एकमेकांवर जबाबदारी टाकण्याचा खेळ सुरू आहे. परिणामी, सामान्य जनता त्रस्त होत आहे. सरकारने जनतेच्या हितासाठी काम करणे आवश्यक आहे. पण इथे मात्र केवळ अंतर्गत वाद आणि निर्णयांवर गोंधळ सुरू आहे, असे मातेले म्हणाले.

## टोरेस कंपनीच्या सीईओवर मुंबई पोलिसांची कारवाई




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई :-पुण्यातील नागरिकांना शेकडो कोटींचा गंडा घालणाऱ्या टोरेस कंपनी घोटाळा प्रकरणात मुंबई पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. टोरेसची मूळ कंपनी असणाऱ्या प्लॅटिनम हर्न प्रायव्हेट लिमिटेडचा सीईओ अर्थात मुख्य कार्यकारी अधिकारी असणाऱ्या मोहम्मद तौसिफ रियाझला पोलिसांनी पुण्याजवळून अटक केली आहे. त्यामुळे शेकडो नागरिकांची फसवणूक करणाऱ्या या घोटाळ्यातील अनेक बाबी उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेष म्हणजे, मोहम्मद तौसिफ रियाज हाच या प्रकरणातील व्हिसलब्लोअर अर्थात प्रकरणाला वाचा फोडणारा व्यक्ती असल्याचा दावा सुरुवातीला करण्यात आला होता.

### टोरेस प्रकरणातली आत्तापर्यंतची पाचवी अटक

मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकानं ही अटकेची कारवाई केली आहे. मोहम्मद तौसिफ रियाझ उर्फ जॉन कार्टर हा या प्रकरणाला वाचा फोडणारा अर्थात व्हिसलब्लोअर असल्याचा दावा सुरुवातीला करण्यात आला होता. शनिवारी रात्री रियाजला पुण्याजवळून अटक करण्यात आल्याच्या वृत्ताला आर्थिक गुन्हे शाखेनं दुजोरा दिल्याचं इंडियन एक्स्प्रेसनं म्हटलं आहे. रियाजला मुंबईत आणल्यानंतर रविवारी त्याला स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आलं. त्यानंतर त्याची ३ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

### कोण आहे मोहम्मद तौसिफ रियाज?

रियाज हा मूळचा बिहारमधील पाटण्याचा रहिवासी आहे. गेल्या काही वर्षांपासून तो मुंबईजवळच्या विरारमध्ये वास्तव्यास होता. स्वत: रियाजनंच आपण व्हिसलब्लोअर असल्याचा दावा केला होता. मात्र, पोलिसांना त्याचाही या प्रकरणात मोठा हात असल्याचा संशय आल्यानंतर पोलिसांनी त्याच्याबाबत सखोल तपास केला. टोरेस घोटाळा उघड होणार असल्याची कुणकुण लागताच रियाजनं कंपनीचे सीए अभिषेक गुप्ता यांच्यामार्फत सादर करण्यात आलेल्या अहवालाचा वापर करून गैरव्यवहार होत असल्याचं जाहीर केलं. त्यातून त्याला स्वत:चा गुन्हा लपवायचा होता, असं तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांनी नमूद केलं आहे.

### काय आहे टोरेस घोटाळा प्रकरण?

गेल्या महिन्याभरापासून मुंबईतील टोरेस घोटाळा प्रकरण चर्चेत आलं आहे. मुंबई, नवी मुंबई आणि आसपासच्या परिसरातील शोरूमच्या माध्यमातून टोरेस कंपनीनं हजारो नागरिकांची फसवणूक केली. आधी ४ टक्के, मग ६ टक्के आणि शेवटी ११ टक्के व्याज परताव्याचं आमिष दाखवून गुंतवणूकदारांकडून लाखो-कोट्यवधींची गुंतवणूक करवून घेतली. त्यानंतर परताव्याची वेळ येताच अचानक कंपनीचे सर्व शोरूम बंद झाल्याचं गुंतवणूकदारांच्या निदर्शनास आलं आणि हा सगळा प्रकार उघड झाला.

आत्तापर्यंत आर्थिक गुन्हे तपास विभागानं चार जणांना अटक केली आहे. त्यात हर्न कंपनीची जनरल मॅनेजर आणि उझबेकिस्तानची नागरिक तानिया झसोतोवा उर्फ तझागुल करासॅनोव्हा सॅसातोवा, संचालक सर्वेश अशोक सुर्वे, स्टोअर इन-चार्ज वॅलेंटिना गणेश कुमार आणि संशयित हवाला ऑपरेटर अल्पशे खारा यांना अटक केली आहे. याव्यतिरिक्त आणखीन ८ युक्रेन व तुर्कियेचे नागरिक या प्रकरणात वॉंटेड असून मुंबई पोलिसांना त्यांच्याविरोधात इंटरपोल नोटीस जारी करवून घेण्यात यश आलं आहे.

## उल्हासनगर मनपाच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर: उल्हासनगर उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहाने पार पडला. मा. प्रशासक तथा आयुक्त सौ. मनिषा आव्हाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येऊन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली.सदर समारंभास आमंत्रित मा. स्वातंत्र्य सैनानी यांना, मा. प्रशासक तथा आयुक्त सौ. मनिषा आव्हाळे , अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर, श्री.किशोर गवस यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

## भिवंडी महानगरपालिकातर्फे ध्वजारोहण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
भिवंडी: भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच राष्ट्रध्वजास महानगरपालिका अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, उप-आयुक्त (मुख्यालय) शैलेश दोंदे, उप-आयुक्त (कर) बाळकृष्ण क्षिरसागर, उप-आयुक्त (समाज कल्याण) प्रणाली घोंगे, उप-आयुक्त (शिक्षण) डॉ. अनुराधा बाबर, शहर अभियंता जमीर पटेल, मुख्य लेखा परिक्षक मयुर हिंगाणे व सर्व सहाय्यक आयुक्त, सर्व प्रभाग अधिकारी, सन्मा. पदाधिकारी व अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये मनपाच्या मुख्य प्रशासकिय इमारतीच्या आवारात मानवंदना देण्यांत आली. यावेळी मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी संविधान उद्देशिका, हरित शपथ, तंबाखू मुक्त भारताची शपथ घेतली.

## दहावी बारावीच्या हॉल तिकीट वरील जातीचा उल्लेख अखेर रद्द

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण : दहावी, बारावीच्या परीक्षांच्या हॉल तिकिटांवरही विद्यार्थ्यांच्या जातीचा उल्लेख करण्याच्या राज्य शिक्षण मंडळाच्या निर्णयावर टीका झाल्यानंतर हा निर्णय रद्द करण्यात येणार आहे. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या भल्यासाठीच घेतला होता. मात्र, त्याविरोधात असलेल्या लोकभावनेचा आदर करत, तो मागे घेत असल्याचे स्पष्टीकरण राज्य शिक्षण मंडळातर्फे देण्यात आले.राज्य शिक्षण मंडळाच्या ११ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या बारावीच्या परीक्षेच्या हॉल तिकिटांचे वितरण सुरू झाले. त्यावर जातीचा रकाना चढल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. त्यातच अनेक विद्यार्थ्यांच्या जातीची नोंद चुकीची असल्याने या विद्यार्थ्यांसह पालकांचा ताणही वाढला होता.अनेकदा शाळेत प्रवेश घेताना जातीची चुकीची नोंद झालेली असते. पुढील शिक्षणात विशिष्ट प्रवर्गातून प्रवेश घ्यायचा असेल, तर जातीची योग्य नोंदणी आवश्यक असते. पालकांना परीक्षेआधीच शाळेत नोंद झालेली जात कळावी, त्यात काही सुधारणा असल्यास त्या तातडीने करून शाळेकडून शाळा सोडल्याचा दाखला घेतानाच त्यावर सुधारित जात यावी, या उद्देशाने राज्य शिक्षण मंडळाने हॉल तिकिटावर जातीचा रकाना टाकला होता.या निर्णयाला समाजातील विविध स्तरांमधून टोकाचा विरोध झाला.राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने ही या निर्णयावर आक्षेप घेत निवेदन देण्यात आले होते.. हॉल तिकिटाचा कागद फक्त त्या परीक्षेपुरता मर्यादित असल्याने त्यावर जातीचा उल्लेख कशाला हवा, असा मतप्रवाह होता. त्याचबरोबर एकीकडे विद्यार्थ्यांना जातीभेद करू नका, अशी शिकवण देताना दुसऱ्या बाजूला परीक्षा प्रवेश पत्रावरच त्यांच्या जातीचा उल्लेख करून त्यांना त्याची जाणीव करून देण्याची गरज नसल्याचेही मत पालक आणि शिक्षणतज्ञ व्यक्त करत होते. या गोष्टींची दखल घेत आता राज्य शिक्षण मंडळाने हा निर्णय रद्द करत असल्याची माहिती दिली. याबाबतचे प्रकटन प्रसिद्ध केल्याचे राज्य शिक्षण मंडळाचे संचालक शरद गोसावी यांनी सांगितले.या निर्णयाचे राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले, राज्य सरचिटणीस संतोष भोजणे,सुखदेव भालेकर,राज्य प्रसिद्धी प्रमुख लहू राक्षे,बबनराव चव्हाण. ,हिरालाल पाटील,धनाजी घरत,रंगनाथ सगर,नरेंद्र कुटे,श्रीराम पळसकर, नागनाथ राजुरे,मनोहर राठोड,राजन पाटील,संजय भोईर,संतोष केंद्रे, सुरेश पांचाळ, अनिल कटके, विनया जाधव, पंकज पाटील,दशरथ कलेटवाड,जयेश सूर्यवंशी, कैलास बांगर,नाथ कारंडे,शंकर शिंदे,बाबासाहेब मटके, भागवत पदकोंडे,शंकर शिंदे,पुरुषोत्तम म्हेत्रे, दिगंबर लक्ष्मण दावणकर, गोरख आघाव, बद्रीनाथ घुले, दिलीपकुमार वानखेडे, प्रल्हाद जायभाये, विजय महाजन, शांतिनाथ पवळे, विवेक डोंगरे, शंकर हसगुळे, व्यंकट पाटील, बाबासाहेब मोराळे, रमेश आचमारे, ज्ञानेश्वर गवळी, राम येडते, निंबा माळी, रमेश मरडे, श्रीकृष्ण गीते, गंगाधर पाटील, अशोक ढाकणे, हनुमंत सगर, सुभाष सानप, संजय मळभागे, रामेश्वर कांदे, अनंत फुलसुंदर, राजेंद्र होले, सुरेश घुले, विजय बाचणे, मनीषा रासकर, रंजना पाटील, माधव जाधव सुदाम खैरनार, मारुती खैरे, श्रीमंत काळे, गजानन देवकते, डॉ.गणेश मल्लिकार्जुन सुरशेट्टी, राजकुमार जाधवर, दीपक पोतदार , अभिलाष जगताप, हनुमंत कटरे, आबाराव बोडके, बळीराम गोरे, दिलीप गोरे, नागनाथ जगताप, देविदास खामकर, शंकर दळवी, गजानन चांभारगे, वैशाली आनंदकर,संतराम ढोले, प्रवीण राऊत,सुदाम बोरुडे, बालाजी काटे, काशिनाथ माळी, विद्याधर पाटील, गोविंद दराडे, नारायण खंडाळे, दिलीप देवकर, गोविंद लटपटे, हरिराम वैद्य, संतोष चव्हाण, संजय करेवाड, प्रतिमा अर्डक, यशवंत केंद्रे प्रदीप वाघमारे, डॉ.शिवाजी परीट मारुती मलशेट्टी, रघुनाथ सगर आदी पदाधिकाऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे..

# सवाई एकांकिका स्पर्धेत जीवनदीपच्या चेतन साबळेचा दमदार अभिनय



जीवनदीप महाविद्यालयातील विद्यार्थ्याने सवाई एकांकिकेच्या अंतिम फेरीत मिळवले प्रथम क्रमांकाचे पारितोषिकदि. २६ जानेवारी २०२५ रोजी मुबई येथे मानाची अशी ' सवाई एकांकिका ' स्पर्धेची अंतिम फेरी पार पडली. या स्पर्धेत ' चिनाब से रावी तक ' या एकांकिकेत जीवनदीप महाविद्यालयातील विद्यार्थी कु. चेतन साबळे याने कसदार अभिनयाचे सादरीकरण करीत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. यासाठी जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. रविंद्र घोडविंदे सर, प्राचार्य डॉ. के.बी.कोरे सर , संचालक श्री. प्रशांत घोडविंदे सर, उप प्राचार्य प्रा. हरेंद्र सोष्टे सर यांनी विशेष अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे मराठी विभागाचे प्राध्यापक व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.महेश थोरात यांनी विशेष मार्गदर्शन व सहकार्य केले.

# जांभूळ ग्रामपंचायतीचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सुंदर गाव पुरस्काराने सन्मान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण पंचायत समितीच्या अंतर्गत येणाऱ्या 'जांभूळ ग्रामपंचायतीला आर आर(आबा)पाटील सुंदर गाव पुरस्कार योजनेत जिल्हा स्तरावरील'जिल्हा सुंदर गाव पुरस्कार मिळाला असून पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार सरपंच परिक्षित हिराजी पिसाळ व ग्रामपंचायत अधिकारी राजाभाऊ सुरवसे यांनी तो स्विकारला. यामुळे जांभूळ ग्रामपंचायतीचा डंका जिल्ह्यात वाजला असून, या सर्वांचे अभिनंदन होत आहे.तर सरपंच परिक्षित पिसाळ यांनी पत्रकार संजय कांबळे यांचे आभार मानले आहे.आर आर(आबा)पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना अंतर्गत सन२०२१/२२व २०२२/२३या आर्थिक वर्षात जिल्हा सुंदर गाव म्हणून कल्याण तालुक्यातील जांभूळ आणि पळसोली, या ग्रामपंचायतीची



सुंदर गाव म्हणून निवड करण्यात आली आहे, यामध्ये जांभूळ ग्रामपंचायत जिल्हा सुंदर गाव तर पळसोली ग्रामपंचायत तालुका सुंदर गाव ठरले आहे. २६जानेवारी, प्रजासत्ताक दिनी ठाणे पोलीस मैदानावर पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ग्रामपंचायतीचे सरपंच परिक्षित हिराजी पिसाळ, व ग्रामपंचायत अधिकारी राजाभाऊ सुरवसे यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे,महापालिका आयुक्त, तसेच डेप्यूटी सीईओ अविनाश फडतरे,प्रमोद काळे आदी मान्यवर उपस्थित होते.या पुरस्काराने कल्याणच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे, यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.उल्हास नदीच्या काठावर वसलेली जांभूळ ग्रामपंचायत ख-या अर्थाने या पुरस्कारास प्राप्त आहे,येथील सोईसुविधा, पाणी पुरवठा, कचरा, सांडपाणी नियोजन, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, शैक्षणिक गुणवत्ता, प्लास्टिक बंदी, आदी विविध बाबतीत ग्रामपंचायतीचे सरपंच, परिक्षित पिसाळ,,उपसरपंच अशोक शिंदे,सदस्य सुमन पिसाळ, गुलाब मुकणे, ज्योती जाधव, सुनिता गोरे, रेखा गायकवाड, अक्षय सांवत, राजाराम मुकणे, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ या सर्वाचे मोठे योगदान लाभले याकरिता ग्रामपंचायत अधिकारी राजाभाऊ सुरोशे यांना मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, छायादेवी सिसोदिया, डेप्युटी सीईओ अविनाश फडतरे, प्रमोद काळे, गटविकास अधिकारी संजय भोये, सहा बीडिओ आर के गवारी,, विस्तार अधिकारी, आदीचे मार्गदर्शन मिळाले म्हणून हा योग जुळून आला., आज ठाणे येथील पोलिस मैदानात आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार वितरण सोहळयात, ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सन्मान चिन्ह, व धनादेश देण्यात आला, . या पुरस्काराने ऐतिहासिक कल्याणच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे,

# रायते-पिंपळोली ग्रामपंचायत मध्ये प्रजासत्ताक दिन सोहळा साजरा!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड दि.२७ : भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनी आदर्श सरपंच राज्य पुरस्कार प्राप्त गृप ग्राम पंचायत रायते-पिंपळोली च्या सरपंच समिता सुरोशी यांच्या हस्ते जिल्हा परिषद शाळा रायते, गृप.ग्रामपंचायत रायते पिंपळोली ग्रामपंचायत कार्यालय व ओम साई प्री प्रायमरी स्कूल रायते येथे माझ्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व हा ध्वजारोहण सोहळा पार पडला. यावेळी सरपंच समिता सुरोशी यांनी तिरंग्याला मानवंदना देत स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सार्वभौमत्व, न्याय अशी मुल्ये जपत भारतीय लोकशाही अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. या ध्वजारोहण सोहळयाप्रसंगी मुख्याध्यापक, शिक्षक, प्राध्यापक, उपसरपंच,सदस्य, सदस्या,ग्रामसेवक, युवक शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेतर कर्मयोगी, पत्रकार यांच्यासह देशप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हॅलो किड्स फेदर्स शाळेतील होमिओपॅथी आरोग्य शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : हॅलो किड्स फेदर्स - दिवा या शाळेअंतर्गत संचालक चेतन पावशे यांच्या प्रयत्नाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत होमिओपॅथिक मेडिकल शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. २६ जानेवारी प्रजासत्ताकदिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांच्या लाडक्या आजीआजोबांसाठी तसेच इतर ज्येष्ठनागरिकांसाठी या शिबिराचे आयोजन केले होते. डॉ. जयप्रकाश शुक्ला यांच्या मार्गदर्शनखाली या शिबिराचा ६० हून अधिक रुग्णांनी लाभ घेतला. हॅलो किड्स फेदर्स दिवा या शाळेमध्ये मोफत औषध उपचार सुविधा देण्यात आली. सचिन, सुभाषचंद्र प्रजापती, उमेश शर्मा यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्धाटन करण्यात आले. या शिबीराच्या दिवशी तपासणी व औषधे मोफत देण्यात आली. या शिबीरामध्ये डॉ. जयप्रकाश शुक्ला, जीवन नथानिएल, वर्षा घुले, सुरेश यादव, अभिमन्यू मिश्रा, महेंद्र प्रसाद आदी होमिओपॅथीक तज्ज्ञांनी रूग्णांवर तपासणी केली.

हॅलो किड्स फेदर्स - दिवा शाळेच्या संचालिका श्वेता पावशे यांनी यशस्वी वैद्यकीय शिबिरासाठी डॉ. जयप्रकाश शुक्ला कोलंबो सहयोगी प्राध्यापक साई होम. मेडिकल कॉलेज, दुगाडफाटा आणि वर्षा घुले, सुरेश यादव, अभिमन्यू मिश्रा, महेंद्र प्रसाद आदी होमिओपॅथीक पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

# कामगारांचे विविध प्रश्न सोडवणार

## - सहसंचालकांचे आश्वासन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : प्रतिनिधीकामगारांच्या फायद्यासंदर्भातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठीईएसआयसीचे सहसंचालक सुधाकर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC), उपप्रादेशिक कार्यालय, ठाणे येथे विविध कामगार संघटनांच्या प्रमुखांसोबत महत्त्वपूर्ण संवाद करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला राष्ट्रीय सर्व श्रमिक संघाचे प्रदेश सरचिटणीस सुरेश कोतळे, महाराष्ट्र राज्य श्रमिक संघाचे सचिव संतोष पठाणे, महाराष्ट्र कष्टकरी युनियनचे अध्यक्ष दिलीपकुमार मुंढे, राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे अध्यक्ष गणेश पाटील व कामगार संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत सुरेश कोलते म्हणाले की, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात ईएसआयसी रुग्णालयांची संख्या खूपच कमी आहे किंवा वैद्यकीय सुविधांचा पूर्ण अभाव आहे. त्यामुळे कामगारांना आरोग्य सेवा मिळण्यात अडचणी येत आहेत. संतोष पठाणे यांनी ईएसआयसीच्या साहित्यात राज्यभाषा वापरावी, स्थानिक लोकांपर्यंत ती अधिकाधिक सुलभ व्हावी, अशी सूचना केली.वागळे विभाग घटक, शिव महिला आघाडी साक्षी पठाणे आणि महाराष्ट्र मजदूर संघाच्या सचिव हीना शेख यांनी ESIC ठाणे कार्यालयातील महिला सुरक्षाव्यवस्थेसाठी बसवलेल्या सीसीटीव्ही कामाचे कौतुक केले. गणेश पाटील यांनी पगार मर्यादा रु. 21,000/- वरून 30,000/- पर्यंत वाढवण्याची सूचना केली. जेणेकरून अधिक संख्येने कामगारांना ESIC योजनेत समाविष्ट करता येईल.या सर्व समस्यांचे सहसंचालक सुधाकर सिंह यांनी प्रभावीपणे निराकरण केले असून या सूचनांची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यात येईल, असे आश्वासन युनियन प्रतिनिधींना देण्यात आले.उपप्रादेशिक कार्यालयाचे उपसंचालक सुशीलकुमार श्यामकुवार यांनी आभार तर सुत्रसंचालन प्रभिषा बालन यांनी केले.

# निरंकारी संत समागमाची सांगता

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जीवनाचा उद्देश केवळ भौतिक प्रगतीमध्ये नसून आत्मिक उन्नतीमध्ये निहित आहे." असे उद्गार निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी महाराष्ट्राच्या 58व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या समापन दिवशी लाखोंच्या संख्येने उपस्थित मानव परिवाराला संबोधित करताना व्यक्त केले.या तीन दिवसीय संत समागमाची रविवारी रात्री विधिवतपणे यशस्वीरित्या सांगता झाली. या संत समागमामध्ये महाराष्ट्रासह देश-विदेशातून लाखो लोकांनी भाग घेतला.सतगुरु माताजी पुढे म्हणाल्या, मानवी जीवन एवढ्याचसाठी श्रेष्ठ मानले गेले आहे, की या जीवनात आत्मज्ञान प्राप्त करण्याची क्षमता आहे. परमात्मा निरकार असून या परमसत्याला जाणणे हेच मनुष्य जन्माचे परम लक्ष्य होय. जीवन एक वरदान असून ते परमात्म्याशी क्षणोक्षणी संलग्न राहून जगायला हवे. क्षणोक्षणी जीवन योग्य दिशेने व्यतीत केल्याने आपल्याला आत्मिक शांती मिळू शकते आणि आम्ही अनंताच्या दिशेने अग्रेसर होऊ शकतो. असे सतगुरु माताजींनी सांगितले

# रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते डोंबिवली रोझ फेस्टिवलचे उद्घाटन

डोंबिवली: डोंबिवलीकर आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांचे मन प्रसन्न करणारा एक अविस्मरणीय अनुभव म्हणजे 'डोंबिवलीकर रोझ फेस्टिवल. गेल्या १५ वर्षांपासून डोंबिवलीत हा रोझ फेस्टिवल भरतो. दरवर्षीप्रमाणे यंदाही शनिवार, रविवारी रामनगर मधील बाल भवन येथे हा फेस्टिवल आयोजित करण्यात आला आहे. त्या फेस्टिवलचे शनिवारी भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याहस्ते उद् घाटन करण्यात आले. या फेस्टिवलला दरवर्षीप्रमाणे इंडियन रोझ फेडरेशन या अखिल भारतीय गुलाबप्रेमींच्या संस्थेतील तज्ज्ञांचे मार्गदर्शन तसेच बॉम्बे रोझ सोसायटी आणि इनर व्हील क्लब, कल्याण यांची बहुमूल्य साथ लाभली आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गुलाबप्रेमी या फेस्टिवलमध्ये सामील झाले आहेत. राष्ट्रीय गुलाब प्रदर्शनातील पारितोषिक विजेते प्रमुख गुलाब उत्पादक वांगणीचे आशिष मोरे यांच्या गुलाबाला 'गुलाबांचा राजा' व 'गुलाबांची राजकुमारी'; पुण्यातील पुंडलिक निम्हण यांच्या गुलाबाला 'गुलाबांची राणी'; वांगणी येथील चंद्रकांत मोरे यांच्या गुलाबाला 'गुलाबांचा राजकुमार' तर मन्सूरा जहूर हुसेन यांच्या गुलाबाला 'सर्वोत्कृष्ट सुवासिक गुलाब' या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. प्रशांत तेलंग, तिझारे, डॉ. धनंजय गुजराथी, निलेश आपटे यांना गुलाब प्रदर्शनात विविध पुरस्कार देण्यात आले. तसेच गेल्या ५० वर्षांपासून सातत्याने गुलाब स्पर्धांमध्ये सहभाग घेणाऱ्या चंद्रकांत मोरे यांना विशेष पुरस्काराने गौरवण्यात आले. डॉ. विकास म्हसकर, बळवंत ठिपसे, रविंद्र भिडे, जगदीश म्हात्रे, गणेश शिर्के, अर्शद भिवंडीवाला, मंछेर इराणी यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले.असा हा आपला जिव्हाळयाचा डोंबिवलीकर रोझ फेस्टिवल रात्री १० वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. आपल्या मित्रपरिवारासोबत या फेस्टिवलला नक्की भेट द्या आणि एक आनंददायी अनुभव घ्या असे अवाहन त्यावेळी आ. रवींद्र चव्हाण यांनी केले.

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सिंहाचे आगमन

मुंबई : बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात २६ जानेवारी रोजी गुजरात येथील सक्करबाग प्राणिसंग्रहालयातून सिंहाच्या जोडीला आणण्यात आले आहे. दरम्यान, सिंहाच्या जोडीच्या बदल्यात राष्ट्रीय उद्यानाकडून वाघाची जोडी सक्करबाग प्राणिसंग्रहालयाला देण्यात येणार आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सिंह सफारी आणि व्याघ्र सफारीला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या सर्वाधिक आहे. याच सिंह सफारी मधील गुजरातहून आणलेली 'मानस' आणि 'मानसी' ही सिंहाची जोडी लोकप्रिय ठरली आहे. दरम्यान, उद्यानात आणलेल्या नवीन सिंहाची जोडी ही तीन वर्षांची आहे. या जोडीला सध्या निरिक्षण कक्षात ठेवण्यात आले आहे.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

संगणक विभाग

निविदा सुचना क्रमांक – कडोमपा/संगणक/१४/२०२४–२०२५

आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, नोंदणीकृत कंपनी किंवा उत्पादक कंपनी व त्यांचे अधिकृत विक्रेते यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीने ई –निविदेद्वारे "Digital Signage Board १ वर्ष ऑनसाईट वॅरंटीसह पूरविणे" या कामाकरीता निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव – तपशील | कामाचे नाव – नग | कोरे निविदा फॉर्म फी | निविदा अनामत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | "Digital Signage Board 1 वर्षाच्या ऑनसाईट वॉरंटीसह पुरवठा करणे" | ११ | ₹६३७२/- | ₹९००००/- | १२ महिने |

अटी व शर्ती:

१. कामाची सविस्तर निविदा सुचना व कोरे निविदा फॉर्म www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. २८/०१/२०२५ ते दि.११/०२/२०२५ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत.

२. निविदा ई – टेंडरिंग कार्यप्रणालीव्दारे दि.२८/०१/२०२५ ते दि.११/०२/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत भरता येतील.

३. निविदा शक्य झाल्यास रोजी दि.१२/०२/२०२५ रोजी दुपारी ३.१५ वाजता ई–टेंडर सेल, कडोंमपा येथे उघडण्यात येतील. तथापि निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार आयुक्त, कडोंमपा यांनी राखुन ठेवला आहे.

४. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, क.डों.म.पा. यांनी राखून ठेवला आहे व त्यांचा निर्णय सर्व निविदा धारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील.

सही/–
आयुक्त
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण

जावक क्रमांक : कडोंमपा/जसंवि/मुका/97
दिनांक : 27/01/2025



महाराष्ट्र शासन

Government of Maharashtra
Forest Department
Mangrove Division- North Konkan
Abhimaan II, 5th Floor, Teen Haat Naka, Naupada, Thane (W)-400 602
Email- dfommcu@gmail.com
Parent Portal: http://mahatenders.gov.in
E-Tender
Tender Notice No. DFO/MDNK/45,46/2024-25.

Online Tender Forms in B-1 Format, for the following work are invited by the Divisional Forest Officer, Mangrove Division- North Konkan, Abhimaan II, 5th Floor, Teen Haat Naka, Naupada, Thane (W)-400 602 from the contractors registered with the Government of Maharashtra in appropriate class of Tender Notice.

The blank tender documents should be downloaded from Government website http://mahatenders.gov.in from 28/01/2025 at 05.00 pm to 11/02/2025 at 05.00 pm. Blank Tender documents will not be sold by this office; interested contractors have to download tender documents from the website. For any queries in this regard the interested contractors can contact on telephone no 022-69309286 during office hours.

All requisite information required for the submission of Bid Capacity documents is available on the above said website.

If any assistance is required regarding e-Tendering (uploading/downloading) please contact NIC Help Desk number: 1800 3070 2232.

| Sr. No | Name of work | Estimated cost | Earnest Money Deposit (Rs.) | Time limit for completion | Cost of Blank Tender Form | Bidder Category |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8. | Providing & Ercting 2.10 mt. high Chainlink Fencing M.S.Angles Post With Y Type barbed wire fencing with seven rows of wire with 2.45 mm dia G.I.Pipe (Rezan / concenti deleted ire 0.75 mm dia) at Malwani in Survey No. 264 CTS No.03 in West Mumbai Range of Mangrove Division -North Konkan | 38,07,900/- | 38,079/- | 4 Months | Rs. 590/- (Including GST) | 7 Reserved for District Labour Society |
| 9. | Providing & Ercting 2.10 mt. high Chainlink Fencing M.S.Angles Post With Y Type barbed wire fencing with seven rows of wire with 2.45 'mm dia G.I.Pipe (Rezan / concenti deleted ire 0.75 mm dia) at charkop sectar-2 Laxmi Nagar in Survey No. 39. CTS No.04 in West Mumbai Range of Mangrove Division North Konkan | 18,13,180/- | 18,132/- | 4 Months | Rs. 590/- (Including GST) | 7 Reserved for District Labour Society |

1) No changes are to be made by the contractor in the tender documents published on the website. If any changes are made the tender documents will be rejected & action accordingly will be taken against the contractor. Information published on the government website will be final.
2) Right to reject any or all the tenders without assigning any reason there of is reserved.

signature
Divisional Forest Officer,
Mangrove Division- North Konkan


'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून,
एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी